# कालिदासांचे साहित्य विविध भाषांत यावे

म.टा. प्रतिनिधी, नागपूर



**राष्ट्रीय संस्कृत परिषदेत संध्या नायर यांचे मत**

'कालिदास हे एक महान कवी होते. त्यांचे साहित्य अमराजमर आहे. या साहित्याचा खोलवर अभ्यास करून आधुनिक इंग्रजीच्या माध्यमातून हे साहित्य जगापुढे येणे आवश्यक आहे', असे मत पाश्चिमात्य साहित्याच्या अभ्यासिका आणि आर.एस. मुंडले धरमपेठ कला वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या नायर यांनी व्यक्त केले.

कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ आणि राष्ट्रीय संस्कृत संस्थान, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात एक दिवसीय राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटन समारंभावेळी नायर बोलत होत्या. मंचावर कवी कुलगुरू कालिदास संस्कृती विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उमा वैद्य, राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाचे प्रा. उमाकांत पांडे, डॉ. अरविंद जोशी, नंदा पुरी, डॉ. कविता होले उपस्थित होते.

'कालिदासांच्या साहित्याचा अभ्यास 'इको क्रिटिसिझम', बिल ब्राउन यांच्या 'थिंग थीअरी' या दृष्टिकोनातून करायला हवा. यामुळे या साहित्याचे सौंदर्य जागतिक स्तरावर विविध भाषांमध्ये समोर येईल,' असे मत संध्या नायर यांनी व्यक्त केले.

प्रा. पांडे म्हणाले, 'कालिदास, जयंत भट, उदयनाचार्य यांसारख्या कवींच्या साहित्यातून अनेक लेखक घडले आहेत. संस्कृत ही एक उत्तम भाषा असून, या भाषेचा आदर व्हायला हवा. या भाषेतील शब्द काही इतर भाषांमध्ये तत्सम शब्दांसारखे वापरून त्यांचा विकास व्हायला हवा.'

कालिदासाच्या साहित्याचा अनेक महान कवींवर आणि लेखकांवर कसा परिणाम पडला, याची उदाहरणे डॉ. नंदा पुरी यांनी दिली. यावेळी त्यांनी कवी कुसुमाग्रज, शांता शेळके चिंतामण देशमुख यांच्या साहित्यातील काही उदाहरणे दिली. अध्यक्षीय भाषणादरम्यान डॉ. उमा वैद्य म्हणाल्या, 'ही परिषद कालिदास यांच्या साहित्याच्या प्रचार व प्रसाराकरिता आयोजित करण्यात आली आहे. हा प्रचार व प्रसार वाढविण्याकरिता विद्यापीठांमध्ये कालिदास अध्यासन प्रस्थापित व्हायला हवे. त्यामुळे या साहित्यावर अधिक संशोधन होईल.' डॉ. दिनकर मराठे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. प्रसाद गोखले यांनी आभार मानले.